# डोलोरेस हुएर्टा

## गरीबांसाठीचा आवाज


लेखक: फ्लोरा फॉस

चित्रे: रॉबर्ट कॅसिल

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक




# डोलोरेस हुएर्टा

## गरीबांसाठीचा आवाज





डोलोरेस हुएर्टाचा जन्म १९३० साली न्यू मेक्सिको राज्यात झाला. घरी खूप गरिबी होती. परंतु आई-वडील प्रेमळ असल्यामुळे तिचे बालपण सुखात गेले.

छोट्या डोलोरेसला माणसे खूप आवडायची. ती प्रचंड बडबड करायची म्हणून आजोबा तिला गंमतीने “सात तोंडाची” म्हणायचे.

तिचे बाबा जुआन खाणीत आणि शेतात खूप कष्टाचे काम करायचे. खाणकामगार आणि शेतमजूर ह्यांना दिवसभर खूप करावे लागे पण त्याबदल्यात त्यांना खूप कमी पैसे मिळत. जुआननी परिस्थिती बदलायचा निश्चय केला. ते पुन्हा शाळेत जाऊ लागळे. नंतर ते न्यू मेक्सिकोमध्ये नेता म्हणून निवडला गेले. मेक्सिकन-अमेरिकन लोकांच्या हक्कांसाठी ते काम करू लागले. डोलोरेसला त्यांचा खूप अभिमान वाटायचा. तीही त्यांच्यासारखीच गरिबांसाठी कामे करण्यासाठी धडपडायची.



डोलोरेस पाच वर्षाची असताना तिची आई मुलांना घेऊन कॅलिफोर्नियाला रहायला आली. तिची आई एक हॉटेल चालवायची. डोलोरेस आणि तिचे भाऊ आईला मदत करायचे. आईही बाबांप्रमाणे दुसऱ्याची काळजी घ्यायला हवी ह्या विचारांची होती. बरेचवेळा ती शेतमजुरांना आपल्या हॉटेलमध्ये मोफत रहायला द्यायची.





छोटी डोलोरेस खूप कामे करायची. ती आईला मदत करायची. ती स्काऊट लीडर होती. ती गाणी म्हण्याची. नाच आणि पियानो शिकायची. यामुळे तिला खूप लोकांना भेटण्याची संधी मिळायची. सगळी माणसे मनाने सारखीच असतात हे तिला त्यामुळे शिकायला मिळाले.





आई-बाबांसारखेच तिने ठरवले होते की मोठे झाल्यावर गरिबासाठी काम करायचे. बाबांप्रमाणेच तीही कॉलेजमध्ये शिकायला गेली. शिक्षिका बनली. गरीब मुलांना शिकवण्याचे काम ती करायची.

तिच्या वर्गातील विद्यार्थी अर्धपोटी असायची, शाळेत अनवाणी यायची. ती त्यांची खूप काळजी घ्यायची.

“मला त्यांच्यासाठी आणखीन काम करायला हवे,” ती म्हणायची.



स्थलांतरित कामगारांना खूप हलाखीच्या परिस्थितीत राहावे लागते हे डोलोरेस पाहत होती. तोडणीसाठी गावोगावी फिरायला लागायचे. वाळवंट, पर्वत, शहरे जे असेल ते पार करून रात्री-मध्यरात्री असा कुठल्याही वेळी प्रवास करावा लागे. शेतात पोचले की लगेच कामाला सुरुवात करावी लागे. ते शेतातली फळे भाज्या काढायचे आणि ते नीट पेट्यात भरून ठेवायचे.

त्यांच्या मुलांची त्यामुळे फरपट व्हायची. सारखे नवीन गाव आणि नवीन शाळा. कुठे किती दिवस राहायचे तेही ठाऊक नसायचे. त्यामुळे मुलांना कधी वाचनालयातून पुस्तक आणून वाचायला किंवा कुणाशी चांगली मैत्री करायला वेळच मिळायचा नाही.



काम करताना ह्या स्थलांतरित मजुरांना कधी जखमा व्हायच्या. पिकांवर मारलेल्या कीटकनाशकांमुळे ते आजारी पडायचे. शेतकऱ्यांनी राहायला दिलेली घरं फार वाईट असायची. अनेक घरात पाण्याची किंवा संडासाची सोय नसायची.



डोलोरेस त्यांच्या मुलांना शिकवण्याचे काम करीत होते. एके दिवशी तिच्या मनात आले की हे काम पुरेसे नाही.

“माझा आवाज खणखणीत आहे. त्याचा वापर मला ह्या मुलांसाठी करता येईल,” तिच्या मनात विचार चमकला.








भरपूर बडबड करायला आवडणाऱ्या ह्या मुलीने लोकांना एकत्र बांधण्यासाठी आपला आवाज वापरायला सुरुवात केली. तिने जगभरातील लोकांपर्यंत ह्या शेतमजुरांना कुठल्या अडचणीचा सामना करावे लागते ते पोहचवले.

डोलोरेस बऱ्याच गोष्टी आपल्या आई-बाबांकडून शिकली होती. बाबांप्रमाणेच ती एक उत्तम नेता आणि वक्ता होती. आईसारखी ती प्रेमळ होती. आपल्या अडचणी लोक तिच्याजवळ मोकळेपणाने बोलायचे.

लवकरच ती कामगार नेते-सीजर शावेज ह्यांना भेटली. तेही स्थलांतरित कामगारांसाठी काम करीत होत. आपण दोघे एकत्र आलो तर अजून चांगला आवाज उठवता येईल हे त्यांना माहित होते. त्यांनी शेतमजुरांच्या मदतीसाठी एक संघटना स्थापन केली. त्याचे नाव नॅशनल शेतमजूर संघटना (NEWA-National Farm Workers Association) असे ठेवले. खूप लोक त्यांना सामील झाले. सगळ्यांनी मिळून शेतमजुरांच्या हक्कासाठी लढा सुरु केला.




एकत्र आल्यावर सीजर आणि डोलोरेसचे जोरदार काम सुरु झाले. शेतमालक मजुरांना पुरेशी मजुरी किंवा राहण्याची चांगली सोय देत नव्हते हे त्यांना दिसत होते. ह्या कामामुळे म त्यांच्या जीवाला धोका होता पण त्यांनी न घाबरता काम सुरूच ठेवले. कामाचा योग्य मोबदला आणि चांगला निवारा मिळणे हा हक्क आहे ह्याची जाणीव त्यांनी कामगारांना करून दिली. बदल घडण्यासाठी काही वर्षे गेली. आणि त्यांच्या कामाला यश मिळाले.





डोलोरेसचे आयुष्य फार धकाधकीचे गेले. तिला स्वत:ची अकरा मुले होती. पण तरीही इतर मुलांसाठी तिच्या मनात कायम कणव होती.

आज डोलोरेसबद्दल अनेकांच्या मनात खूप आदर आहे. तिला अनेक बक्षिसे व पुरस्कार मिळाले आहेत. पण अजूनही जग बदलण्यासाठीचा तिचा झगडा चालूच आहे. आणि जेव्हा सात तोंडाची बाई बोलते तेव्हा अर्थात लोकांना ऐकावेच लागते.

समाप्त